॥ स्त्रीशक्तिरतुल्या सदा ॥

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक:-ममआ-२०२६/सफाईगार/का-१/665
दिनांक:- ३१.०७.२०२६

## नोटीस

विषय:- सफाईगार सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात सफाईगाराची सुविधा पुरविणेसाठी खालील तपशिलानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तपशिल :- आयोग कार्यालयाचे एकूण क्षेत्रफळ ५५१३ चौ.स्क्वे.फूट

१. कामकाजाची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत अशी राहील.
२. दररोज दोन वेळा सर्व प्रसाधन गृहाची (बेसीनसही) स्वच्छता करणे.
३. दररोज संपूर्ण कार्यालयात झाडू मारणे व ओला मॉप मारणे, फर्निचर, संगणक स्वच्छ करणे
४. आठवड्यातून एकदा संपूर्ण जाळ्या काढणे, फर्निचरवरील डस्टिंग करणे, कार्यालयातील पंखे स्वच्छ करणे.
५. दररोज काचा स्वच्छ करणे
६. महिन्यातून कमीत कमी एकदा व आवश्यकतेनुसार गोडाऊन स्वच्छ करणे
७. आयोगाची कटलरी आवश्यकतेप्रमाणे स्वच्छ करणे.
८. आपला कर्मचारी अनुपस्थित रहाणार असेल तर त्याच्या बदली दुसरा कर्मचारी त्वरीत पाठविण्यात यावा व तसे तात्काळ आयोग कार्यालयास कळविण्यात यावे.
९. सदर कामासाठी लागणारे सर्व सामान प्रत्येक महिन्यास आपल्या संस्थेमार्फत पूरविण्यात यावे तसेच कर्मचाऱ्याने हॅडग्लोव्हज, मारक इत्यादीचा वापर करून काम करावे आणि दक्षता बाळगून काम करण्यात यावे.

सदरबाबत इच्छूक असणाऱ्या बाह्ययंत्रणेमार्फत सेवा पूरविणाऱ्या अधिकृत संस्थेमार्फत/एजसींनी आपली दरपत्रके संस्थेच्या लेटरहेडवर दर नमुद करून कराबाबत व लागणारा संपूर्ण खर्चाचा तपशिल तसेच आपल्या संस्थेची माहिती सीलबंद लखोट्यात आपली दरपत्रके महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय, गृहनिर्माण भवन, पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे दि.१८.०८.२०२६ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत पत्यावर सादर करावीत. सदर कामासाठी लागणारे मनुष्यबळावरील होणारा खर्चही संस्थेला सोसावा लागेल. तसेच दरकरार रक्कम, जीएसटी क्रमांक व लागू कर आकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी. दरपत्रकामध्ये नोटीसच्या संदर्भाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

विहीत प्राप्त झालेली दरपत्रके कार्यालयीन दरपत्रक समितीसमक्ष त्याच दिवशी दुपारी ०४.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. सदर बाबतच्या प्राप्त दरपत्रकामधून योग्य त्या दरपत्रक धारकांची निवड करण्यात येईल. सदर प्रक्रियेबाबत कोणताही बदल किंवा रद्द करण्याचा अंतिम निर्णय संपूर्णतः महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाचा राहील याची कृपया नोंद घ्यावी.

(मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने)

प्रशासकीय अधिकारी

ठिकाण:- वांद्रे (पूर्व), मुंबई